महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७४ वा | दिनांक : ०१/०९/२०२५ | वार : सोमवार

# सरसकट कुणबी संबोधण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार



**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांची सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी आहे, मात्र मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने या मागणीला स्पष्टपणे नकार दिला आहे. त्यामुळे, मराठा आरक्षणासाठी नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. दोन्ही न्यायालयांचे निकाल हा या मार्गातील सर्वात मोठा अडथळा ठरला आहे. हा पेच सोडवण्यासाठी उपसमितीचे प्रमुख मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्याच्या महाधिवक्त्यांसोबत सायंकाळी 5 वाजता बैठक बोलावली आहे.

यापूर्वी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांमुळे 'सरसकट कुणबी' असा उल्लेख करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, मराठा आरक्षणाचा मार्ग काढण्यासाठी उपसमितीची ही बैठक अत्यंत महत्त्वाची आहे. या बैठकीनंतर नेमका कोणता तोडगा निघतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

जगन्नाथ होले यांनी बाळासाहेब रंगनाथ चव्हाण यांच्या 2001 च्या कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेतल्याने हा वाद सुरू झाला. यावर दाद न मिळाल्याने होले यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. 17 ऑक्टोबर 2003 रोजी, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी.एच. मार्लापल्ले आणि ए.एस. बग्गा यांच्या खंडपीठाने निकाल दिला. या निकालातील परिच्छेद 17 मध्ये नमूद केले आहे की, जर हे प्रमाणपत्र ग्राह्य धरले, तर महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाज कुणबी म्हणून स्वीकारावा लागेल, जे एक 'सामाजिक मूर्खपणा' ठरेल.

या निर्णयाविरोधात बाळासाहेब चव्हाण यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले. परंतु, 15 एप्रिल 2005 रोजी न्यायमूर्ती बी.एन. अग्रवाल आणि पी.के. बालसुब्रमण्यम यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवत हस्तक्षेप करण्यास नकार दिला आणि चव्हाण यांची याचिका फेटाळून लावली.

सुहास दशरथे विरुद्ध महाराष्ट्र सरकार या आणखी एका प्रकरणातही उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाबाबत महत्त्वाचा निकाल दिला. 6 ऑक्टोबर 2002 रोजी न्यायमूर्ती मार्लापल्ले आणि न्यायमूर्ती एन. व्ही. दाभोळकर यांच्या खंडपीठाने यावर निकाल देताना परिच्छेद 46 मध्ये म्हटले की, जर जात पडताळणी समितीकडे मांडलेली भूमिका स्वीकारली, तर मराठा समाजातील प्रत्येक व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र द्यावे लागेल. न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, असे केल्यास ते महाराष्ट्रातील 'वास्तविक सामाजिक व्यवस्थेच्या' विरोधात जाईल. त्यामुळे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालांनुसार सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे शक्य नाही, हाच सध्या सरकारपुढील सर्वात मोठा अडथळा ठरला आहे.

# रामानंद सागर यांचे पुत्र व निर्माते प्रेम सागर यांचे निधन





चित्रपट निर्माते रामानंद सागर यांचे पुत्र आणि निर्माते प्रेम सागर यांचे रविवारी निधन झाले. आज सकाळी १० वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

प्रेम सागर यांचे अंत्यसंस्कार आज मुंबईतील जुहू येथील पवनहंस स्मशानभूमीत केले जातील.

एका सूत्राने एनडीटीव्हीला सांगितले की, "ते काही काळापासून आजारी होते आणि त्यांना मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रविवारी डॉक्टरांनी त्यांना घरी नेण्याचा सल्ला दिला.

प्रेम सागर यांनी पुणे येथील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) येथून प्रशिक्षण घेतले. ते १९६८ च्या बॅचचे विद्यार्थी होते. FTII मधील त्यांच्या शिक्षणामुळे त्यांना एक मजबूत तांत्रिक पाया मिळाला. या काळात छायाचित्रण आणि छायांकनाची त्यांची समज अधिकच गहिरी झाली.

प्रेम सागर यांनी सागर आर्ट्स बॅनरखाली बराच काळ काम केले. हे प्रॉडक्शन हाऊस त्यांचे वडील रामानंद सागर यांनी सुरू केले होते. रामानंद सागर हे रामायण ही टीव्ही मालिका बनवण्यासाठी ओळखले जातात.

'रामायण' हा चित्रपट पहिल्यांदा १९८७ मध्ये दूरदर्शनवर प्रसारित झाला होता. प्रेम सागर यांनी या बॅनरच्या अनेक प्रकल्पांमध्ये स्थिर छायाचित्रकार आणि छायांकनकार म्हणून काम केले.

प्रेम सागर हे 'अलिफ लैला' या टीव्ही मालिकेचे दिग्दर्शक होते. याशिवाय त्यांनी 'काकभूशुंडी रामायण' (2024) आणि 'कामधेनु गौमाता' (2025) या धार्मिक प्रकल्पांची निर्मिती केली. निर्माता म्हणून त्याने 'हम तेरे आशिक हैं' (1979), 'बसेरा' (2009) आणि 'जय जय शिव शंकर' (2010) सारखे प्रोजेक्ट्सही केले.

त्यांनी चित्रपटांमध्येही आपली तांत्रिक ओळख निर्माण केली. त्यांनी १९६८ च्या 'आँखें' आणि १९७२ च्या 'ललकार' चित्रपटात कॅमेरा आणि इलेक्ट्रिकल विभागात काम केले, तर १९७६ च्या 'चरस' चित्रपटात ते छायांकनकार होते.

# भटक्या विमुक्त समाजासाठी महत्त्वाचा निर्णय : दाखले आणि प्रमाणपत्रांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करणार; मंत्री अतुल सावे यांची घोषणा



**छत्रपती संभाजीनगर :** भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. १९५२ साली भटक्या विमुक्त समाजावरील गुन्हेगारी जमातीचा कलंक दूर करण्यात आला होता. त्याची स्मृती म्हणून हा दिवस साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी भटक्या विमुक्त जाती-जमातींसाठी महत्त्वाची घोषणा केली. विविध दाखले आणि प्रमाणपत्रे मिळविण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार आहे.

एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी समाजाला आश्वासन दिले. शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

मंत्री सावे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. राज्यात ६३ वसतिगृहे बांधण्यात आली आहेत. शालेय ते महाविद्यालयीन शिक्षण, परदेशी शिक्षण आणि रोजगारासाठी विविध योजना सुरू आहेत.

कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, इमाव संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट यांनी भटक्या जमातींना शिक्षणाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. उच्च पदांवर जाऊन समाजबांधवांना मदत करण्याचे आणि प्रगतीसाठी निर्धार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ सप्टेंबर २०२५


## कालिकादेवी विद्यालयाचा "श्री कालिका पॅटर्न" एक नाविण्यपूर्ण उपक्रम...



**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी "श्री कालिका पॅटर्न" हा एक नाविण्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे.आधुनिक काळात विविध क्षेत्रामध्ये जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता, एक दूरदृष्टिकोन लक्षात घेऊन. दहावी-बारावी नंतर सीईटी, जेईई, नीट, नर्सिंग, आयसर, डीप्पर, ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती इत्यादी परीक्षा तसेच पदवीनंतर विविध अभ्यासक्रमासाठीच्या सीईटी, सेट, नेट, पेट, स्टाफ सिलेक्शन, एमपीएससी, युपीएससी, आयपीएससी, आयएएस इत्यादी स्पर्धा परीक्षांना पण विद्यार्थ्यांना सामोरे जाता येईल अशा स्पर्धा परीक्षेच्या धरतीवर 'श्रीकालिका पॅटर्न' एक नवोपक्रम सुरू केला आहे.या उपक्रमाचे शिरूर (का.)तालुक्यात व पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक होत आहे.आणि यामुळे 'आदर्श शिक्षण संस्था, बीड' चा जिल्हाभरात लौकीक वाढत चालला आहे. याचाच भाग म्हणून माध्यमिक विभागात इ.५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर पंधरा दिवसाची पहिली 'कालिका पॅटर्न परीक्षा' प्राचार्य केशव भांगे साहेबांच्या निरीक्षणाखाली पार पडली. त्यामध्ये गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. आहेत.यासाठी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व विभागाचे प्रमुख, सर्व कनिष्ठ प्राद्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात



**जालना (प्रतिनिधी)** हॉकीचेजादुगार मेजर ध्यानचंद यांच्या नावाने राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा होतो. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी क्रीडा संचालक डॉ. बी.बी.सले म्हणाले की, मेजर ध्यानचंद यांच्या खेळातील प्राविण्याने ऑलिंपिक सारख्या आंतरराष्ट्रीय खेळात भारताला ३ सुवर्ण पदक मिळाले. त्यांच्या खेळामुळेच ते जीवनात खूप यशस्वी झाले. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. जीवनात प्रत्येकाला संधी मिळते, त्या संधीचे सोने केले पाहिजे. मेजर ध्यानचंद यांना मिळालेली एकही संधी त्यांनी सोडली नाही. विद्यार्थ्यांनो खेळात प्राविण्य मिळवा. तर तुमचे मन व आरोग्य उत्तम राहील. या निमित्ताने घेण्यात आलेल्या टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेत पुरुष गटातून सार्थक शेळके, करण शेजुळ, आदित्य काळे आणि महिला गटातून निकिता पारे, प्राची जाधव, सारा मरियम यांना प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त वाद विवाद स्पर्धा संपन्न



**छत्रपती सभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती सभाजीनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना पदवीधर विभाग आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त वादविवाद स्पर्धा संपन्न झाली यावेळी प्रा.डॉ.बलभीम चव्हाण रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.निर्मला जाधव रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.गजानन दांडगे रासेयो कार्यक्रम अधिकारी यावेळी उपस्थित होते या वादविवाद स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सुरज नरोटे व अभिषेक गावडे यांनी दृतीय क्रमांक वैभव कराळे व संचित अंभोरे तृतीय क्रमांक सागर मागरे व दीप्ती सोनवणे यांनी पटकावला व सूत्र संचालन अभिषेक गावडे यांनी केले यावेळी राष्ट्रीय राष्ट्रीय सेवा योजना चे स्वयंसेवक व विद्यापीठातील विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त समृद्धी शिंदेचा सत्कार




राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवणारी समृद्धी प्रवीण शिंदेचा सत्कार करताना छत्रपती संभाजी नगरचे विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील मुक्तानंद गोस्वामी सांडू वाणी डॉ. समाधान इंगळे आदी.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ सप्टेंबर २०२५


## मराठा आंदोलकांकडून सुप्रिया सुळेंच्या गाडीवर हल्ला



**पुणे :** मुंबई येथील मनोज जरांगे यांचे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी पुन्हा एकदा उपोषण सुरू झाले असून आजचा तिसरा दिवस आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज आझाद मैदानावर जाऊन जरांगेंची भेट घेतली. तसेच तिथून निघत असताना मराठा आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांना घेरा घालण्याचा प्रयत्न केला. सुप्रिया सुळे गाडीत बसल्यावर त्यांच्या गाडीवर पण्याच्या बॉटल फेकल्याची घटना घडली. यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया देत महायुती सरकारवर टीका केली आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, सुप्रिया सुळे मराठा आंदोलकांना भेटण्यासाठी गेल्या असता काही लोकांनी त्यांना घेराव घातल्याची बातमी मोठी करून दाखवली जात आहे. ब्रेकिंग न्यूज च्या नावाखाली "पवारांनी मराठ्यांचे वाटोळे केले" अशी ही एक बातमी दाखवली जात आहे. खरंतर मी पवारांची अनेक वर्ष टीकाकार राहिले आहे. मात्र पवारांनी मराठ्यांचे वाटोळे केले हे काही पटण्यासारखे नाही. महाराष्ट्रात संस्थात्मक काम उभा करण्यामध्ये पवारांचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही. सहकार क्षेत्राचे कार्य जाळे पवारामुळेच महाराष्ट्रात गावा खेड्या पर्यंत पोहोचू शकले.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये दिसणाऱ्या मराठा समुदायाच्या शिक्षण संस्था, साखर कारखाने, ऑइल मिल, डाळ मिल, पेपर मिल, दूध डेरी हे उभे करण्यात नक्कीच पवारांचे योगदान आहे. आज घडीला भाजपने ज्या अनेक नेत्यांना मांडीवर घेतले आहे हे नेते सुद्धा पवारांनीच उभे केले आहेत. एकनाथ शिंदे यांची बार्गेनिंग पॉवर झिरोवर आणून भाजपासोबत सत्तेत बसलेले अजित पवार हे शरद पवारांनीच घडवलेले आहेत. अजित पवारांना राजकारणात तयार करणे म्हणजे मराठ्यांचे वाटोळे करणे असे असेल तर मग अजित पवारांच्या सत्तास्थानी असल्याचे लाभ घेणारे सगळे कोण आहेत ते एकदा शोधले पाहिजेत.

मराठा आरक्षणाची मागणी पवारांच्या ऐन उमेदीच्या काळात कधीही झाली नाही. या मागणीने जोर धरला तो साधारण 1992 नंतर. पण तोपर्यंत पवारांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून राष्ट्रवादी नावाचा नवा पक्ष स्थापन केला होता. आणि या पक्षाची केंद्रात कधीही सत्ता आली नाही. इतरांच्या मदतीने केंद्रातल्या सत्तेचे एखादे पद नक्की मिळालेले असेल. मात्र संपूर्ण पक्षाची अशी सत्ता केंद्रात कधीही मिळाली नाही, अशी माहिती सुषमा अंधारे यांनी दिली.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, 1995 ते 2005 या काळामध्ये विविध मराठा संघटनांची आरक्षणांवर चर्चा आणि बैठका जेव्हा सुरू झाल्या विशेषतः संभाजीनगर येथे क्रांती सेनेच्या शालिनी पाटील, मराठा संग्रामचे विनायक मेटे, छावाचे अण्णा जावळे किंवा अनेक संघटना जेव्हा एकत्र आल्या तेव्हा त्या मंचावर शरद पवारही होते. पण तेव्हा आर्थिक निकषावर आरक्षण मिळाले पाहिजे याची चर्चा सुरू झाली होती. आरक्षणाची जी आजची मागणी आहे ती ओबीसीतून आरक्षण मिळाले पाहिजे अशी आहे आणि ही मागणी एका तांत्रिक पेचात अडकलेली आहे.

50 टक्के पेक्षा आरक्षणाची मर्यादा वाढवता येत नाही हा माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय या फेरबदल करण्याची क्षमता जर कुणाची असेल तर ती फक्त आणि फक्त सर्वोच्च न्यायालयाशी समक्ष असणारी दुसरी संस्था म्हणजे संसदेची. संसदेत सत्ता पवारांची नाही तर ती भाजपाची आहे. मग तरीसुद्धा सुप्रिया सुळेंना घेराव का घातला जावा? तर याचे उत्तर सोपे आहे. आपल्याला भूक लागली तर आपण शेजाऱ्यावर चिडचिड करत नाही आपल्या घरातल्या आई किंवा बाबाकडे हक्काने मागतो, असे अंधारे यांनी म्हटले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## निवासी अस्थिव्यंग व स्व. गणपतराव कदम निवासी मुकबधीर विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध खेळांचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य दिव्यांग विकास परिषद, बालरंगभूमी परिषद, निवासी अस्थिव्यंग शाळा सावंगी नायगाव रोड औरंगाबाद व स्व. गणपतराव कदम निवासी मुकबधीर विद्यालय सिडको परिसर सावंगी येथे दिनांक २८ व २९ ऑगस्ट २०२५ राष्ट्रीय क्रीडा देना निमित्त दोन दिवस शाळेत दिव्यांग क्रीडा महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. दिव्यांग विद्यार्थांचे कॅरम, बुद्धिबळ, चित्रकला,मूकबधिर विद्यार्थ्यांचे क्रिकेट,फुटबॉल अशा क्रीडा स्पर्धेचे आयोजन आणि सोबत वृक्ष रोपण एक पेढ माँ के नाम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सहसंचालक क्रीडा व युवक सेवा संचनालय चंद्रकांत कांबळे, बालरंगभूमी परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ हसन इनामदार, माजी नगरसेवक नासेर नाहदी चाऊस, रमजानी खान, युसुफ खान वाय. के. बिल्डर, ॲड. अमर राऊत, प्रा. अनिल मोरे, डॉ अफसर शेख संपादक आरोग्य जागृती, आधार संस्थेचे अध्यक्ष सतीश वानखेडे, साजीद पटेल, राष्ट्रवादीचे रफिक भाईजी, पत्रकार शेख मुख्तार शेख सोहेल इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या भाषणात शाळेला मदत करण्याचे आश्वासन दिले. चंद्रकांत कांबळे यांनी एक संगणक देणार असल्याचे जाहीर केले. बालरंगभूमी परिषद तर्फे शाळेला दिव्यांग महोत्सवात समाविष्ट करण्याचे आश्वासन दिले. सदर हा महोत्सव सप्टेंबर महिन्यात होणार आहे. युसुफ खान यांनी शाळेला आर्थिक मदतीचे वचन दिले, नासेर नाहदी चाऊस यांनी शाळेला मदत करणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले सदर कार्यक्रमासाठी डॉ सबा शेख, रुबीना सय्यद, सना शेख, जैनब झैदी, अक्षय शिंदे, आरिफ पठाण, प्रशांत चव्हाण, इम्रान खान, रिझवान शेख, अब्दुल हक पटेल, शकीला पटेल, इमाम मौलाना, अय्युब पटेल, सादिक मौलाना, लतिफ शेख यांनी परिश्रम घेतले.

## सुप्रिया सुळे जरांगेंच्या स्टेजवर गेल्याच कशाला? शरद पवारांचाही पाठिंबा आहे का? - ओबीसी नेते प्रकाश शेंडगेंचा संतप्त सवाल



**मुंबई :**आमचा सुप्रिया सुळे यांना सवाल आहे ते जरांगेंच्या स्टेजवर गेल्याच कशाला? त्यांच्या वडिलांनी देशात पहिल्यांदा ओबीसी समाजाला मंडल आयोग लागू करून आरक्षण दिले आणि त्याच आज जरांगेना पाठिंबा द्यायला स्टेजवर जातात? याला शरद पवारांचा पाठिंबा आहे का? असा सवाल ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केला आहे. सुप्रिया सुळे यांनी आज मनोज जरांगे यांची आझाद मैदानात जाऊन भेट घेतली, यावरून शेंडगे यांनी टीका केली आहे.

प्रकाश शेंडगे म्हणाले, सुप्रिया सुळे यांना कोणी दगड मारले हा आमचा प्रश्न नाही, ते सरकार आणि पोलिसांनी पहावे. जरांगे यांची कायद्याला धरून मागणी नाही, घटनेला धरून मागणी नाही. कोणीतरी म्हणते गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही आणि त्यांच्या स्टेजवर सुळे जातात. याबाबत आम्ही शरद पवारांची भेट घेणार आणि याबाबत त्यांना प्रश्न विचारणार, असे शेंडगे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, मनोज जरांगे यांची मागणी कायद्याला धरुन नाही. याबाबतीत कागदपत्रे माझ्याकडे आहेत. ॲड जयश्री पाटील विरुद्ध महाराष्ट्र सरकार या केसमध्ये कोर्टाने स्पष्ट केले आहे. कुणबी वेगळे आहेत, मराठा वेगळे आहेत. त्यामुळे जी मागणी केली जात आहे ती घटनेला धरुन नाही.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमलेली शिंदे समिती आणि त्यांनी दिलेला अहवाल हा बोगस असल्याची टीका प्रकाश शेंडगे यांनी केली आहे. ते म्हणाले, याबाबत आमची कायदेशीर लढाई सुरू आहे. 58 लाख देण्यात आलेले दाखले बोगस आहेत. मराठा समाजाची फसवणूक सुरु आहे. सर्व दाखले बाद होणार आहेत.

पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, इतिहासातील गॅझेटमध्ये नाव आहे म्हणून तो मागास आहे असे होत नाही. त्यामुळे देण्यात आलेले दाखले बोगस आणि खोटे आहेत. जर असे दाखले देणे शक्य असते तर पूर्ण देश ओबीसी झाला असता. उद्या दुपारी ३ वाजता मिटिंग आहे. आम्ही सर्व ओबीसी एकत्र येत आहोत आणि या सगळा गोष्टींच्या विरोध करणार आहोत असे शेंडगे म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ सप्टेंबर २०२५

# राष्ट्रीय पोषण सप्ताह : सुदृढ समाजासाठी आरोग्यदायी आहाराचे महत्त्व

आपल्या भारत देशात दरवर्षी १ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर या कालावधीत 'राष्ट्रीय पोषण सप्ताह' साजरा केला जातो. हा केवळ एक सरकारी उपक्रम नसून, एक सामाजिक आंदोलन आहे. मानवी जीवनाचा आणि समाजाचा पाया हा योग्य पोषणावर अवलंबून असतो. पोषण म्हणजे केवळ पोट भरणे नव्हे, तर शरीराला आवश्यक असणारे सर्व पोषक घटक, जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने योग्य प्रमाणात मिळणे होय. १९८२ साली भारत सरकारने या उपक्रमाची सुरुवात केली. त्यामागचा उद्देश केवळ लोकांना आरोग्यदायी आहाराचे महत्त्व पटवून देणे एवढाच नाही तर समाजात पोषणाबाबत, आहाराबद्दल आणि आरोग्याबद्दल योग्य जागरूकता निर्माण करून कुपोषणमुक्त आणि सुदृढ भारत घडवणे हा आहे.

आजच्या धकाधकीच्या युगात, बदलत्या जीवनशैलीत आणि असंतुलित आहार पद्धतीत पोषण हा प्रश्न फक्त ग्रामीण किंवा आदिवासी भागापुरता मर्यादित न राहता शहरी जीवनातही तितकाच गंभीर झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय पोषण सप्ताह हा केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता तो आपल्या जीवनशैलीत बदल घडवून आणणारा महत्त्वपूर्ण सामाजिक चळवळ म्हणून पाहणे गरजेचे आहे. मानवी आयुष्यातील सर्व टप्प्यांत पोषण हा महत्वाचा पाया ठरतो. बालकाच्या वाढीमध्ये, किशोरवयीन मुलामुलींच्या शारीरिक व मानसिक विकासात, प्रजननक्षम वयातील महिलांच्या आरोग्यात आणि वृद्धापकाळातील रोगप्रतिकारशक्तीत पोषक आहाराची भूमिका अमूल्य असते. परंतु दुर्दैवाने भारतासारख्या विकसनशील देशात अजूनही कुपोषण ही मोठी समस्या आहे.

पोषण किंवा संतुलित आहार म्हणजे नेमके काय? तर केवळ भूक भागवणे किंवा पोट भरणे म्हणजे पोषण नव्हे, तर शरीराला आवश्यक असणारे प्रमुख घटक जसे की प्रथिने, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, खनिजे व पाणी यांचा संतुलित व योग्य प्रमाणात आहारात समावेश होणे आवश्यक आहे. प्रथिने शरीराच्या वाढीसाठी आणि दुरुस्तीसाठी आवश्यक असतात. डाळी, दूध यांमध्ये प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. कर्बोदके शरीराला ऊर्जा देतात. गहू, ज्वारी, बाजरी, भात आणि बटाटे हे कर्बोदकांचे मुख्य स्त्रोत आहेत. जीवनसत्त्वे आणि खनिजे शरीराला विविध रोगांपासून वाचवतात आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. हिरव्या भाज्या, फळे, दूध आणि सूर्यप्रकाशातून मिळणारे 'ड' जीवनसत्व हे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. आपल्या पारंपरिक भारतीय आहारात या सर्व घटकांचा नैसर्गिक समावेश दिसून येतो. डाळी, कडधान्ये, भात, भाकरी, भाजीपाला, दूध, फळे, सुकामेवा, मसाल्यांचे योग्य संयोजन हे आरोग्यदायी आहाराचे उत्तम उदाहरण आहे.

मात्र आजच्या वेगवान जीवनात, आपण अनेकदा आरोग्याला दुय्यम स्थान देतो. झटपट तयार होणारे अन्न, फास्ट फूड, जंक फूड, गोड पेये, जास्त मीठ-तेल-साखर असलेला आहार आणि अयोग्य खाण्याच्या सवयींमुळे आपले आरोग्य धोक्यात आले असून जीवनशैलीजन्य रोग झपाट्याने वाढू लागले आहेत. यामुळे अनेक नवीन समस्या जसे की मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि लठ्ठपणा वाढत आहेत. विशेषतः तरुण पिढीमध्ये ही समस्या जास्त दिसून येते. म्हणूनच, योग्य पोषण आणि संतुलित आहाराचे महत्त्व समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या पारंपारिक भारतीय आहारात सर्व पोषक घटक असतात. आपल्या जेवणात भात, पोळी, डाळी, भाज्या, दही, ताक, सलाड आणि फळे यांचा समावेश असतो. पण, आधुनिकतेच्या नावाखाली आपण हा आहार सोडून पाश्चिमात्य आहार पद्धती स्वीकारत आहोत, ज्यामुळे अनेक गंभीर आरोग्य समस्या निर्माण होत आहेत.

राष्ट्रीय पोषण सप्ताहात याच बाबीवर भर दिला जातो. संतुलित आहाराची सवय लहानपणापासूनच लावणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. शालेय पोषण आहार योजना, आंगणवाडीतील पूरक आहार, गर्भवती व स्तनदा महिलांसाठीचे पोषण कार्यक्रम हे उपक्रम त्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. केंद्र सरकारने सुरू केलेली 'पोषण अभियान' योजना ही राष्ट्रीय पोषण सप्ताहाला मिळालेली अधिक व्यापक दिशा आहे. या योजनेचा उद्देश २०२५ पर्यंत कुपोषण निर्मूलन साध्य करणे हा आहे. मुलांमध्ये स्टंटिंग, वेस्टिंग आणि ॲनिमिया कमी करण्यासाठी बहुआयामी प्रयत्न यातून सुरू आहेत. परंतु केवळ सरकारी योजना पुरेशा नाहीत, यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. कुटुंब हे पोषणाची पहिली शाळा असते. घरातील आहार पद्धतीत बदल करून आपण मोठी क्रांती घडवू शकतो. जेवणात ताज्या भाज्या, फळे, कमी तेल-मीठ-साखर यांचा समावेश, मुलांना पौष्टिक अन्न देणे, सण-उत्सवात पारंपरिक आरोग्यदायी पदार्थांना स्थान देणे या छोट्या वाटणाऱ्या कृतींचा मोठा परिणाम घडतो. ग्रामीण भागात उपलब्ध स्थानिक अन्नधान्य, भाज्या, फळे, कडधान्ये यांचा योग्य वापर करून खर्च कमी करतानाच पोषणमूल्य वाढवता येते.

पोषण हा केवळ आरोग्याचा प्रश्न नाही तर तो आर्थिक व सामाजिक विकासाशीही निगडित आहे. कुपोषण ही आपल्या देशासमोरील एक मोठी समस्या आहे. गरिबी, निरक्षरता, आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे अनेक मुले आणि स्त्रिया कुपोषणाचे बळी ठरतात. कुपोषणामुळे त्यांची शारीरिक आणि बौद्धिक वाढ खुंटते, आणि ते विविध आजारांना सहज बळी पडतात. कुपोषित पिढी कधीही सक्षम नागरिक होऊ शकत नाही. शारीरिक क्षमतेत कमतरता, मानसिक विकासात मागासलेपणा, कामकाजातील अकार्यक्षमता या सर्व गोष्टी थेट देशाच्या उत्पादनक्षमतेवर परिणाम घडवतात. त्यामुळे पोषण हा राष्ट्रीय विकासाचा घटक आहे हे ओळखणे गरजेचे आहे. म्हणूनच जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफसारख्या संस्था पोषणाकडे विकासाच्या दृष्टीकोनातून पाहण्याचा आग्रह धरतात.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पोषणविषयक माहिती मिळवणे कठीण राहिलेले नाही. तरीसुद्धा चुकीच्या जाहिराती आणि डाएट्समुळे अनेक लोक गोंधळतात. उपासमारी आणि कुपोषण हा एक टोकाचा प्रश्न असताना दुसऱ्या टोकाला स्थूलतेची समस्या देखील गंभीर रूप धारण करत आहे. अनियमित जीवनशैली, फास्ट फूडचे अतिसेवन, आणि शारीरिक श्रमाचा अभाव यामुळे अनेक लोक स्थूल होत आहेत. स्थूलता केवळ शरीरावर परिणाम करत नाही, तर मानसिक आरोग्यावरही नकारात्मक परिणाम करते. स्थूलता टाळण्यासाठी, नियमित व्यायाम करणे आणि योग्य आहाराचे पालन करणे आवश्यक आहे. नियमित व्यायाम केल्याने शरीर तंदुरुस्त राहते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. योगा, चालणे, धावणे किंवा कोणताही मैदानी खेळ नियमित खेळल्यास शरीर आणि मन दोन्हीही निरोगी राहतात. वजन कमी करण्याच्या अवास्तव धडपडीत शरीराला आवश्यक पोषक घटक न मिळाल्याने तरुण पिढी त्रस्त होत आहे. त्यामुळे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाशिवाय आहारशैलीत बदल टाळावा. संतुलित आहारासोबत नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक ताणावर नियंत्रण हे घटकही तितकेच महत्त्वाचे आहेत.

राष्ट्रीय पोषण सप्ताह हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. आपण स्वतःचा आहार तपासावा, आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आवश्यक पोषण मिळते का याचा विचार करावा आणि समाजात याबद्दल जनजागृती करावी. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, आरोग्य कर्मचारी, माध्यमे यांनी मिळून पोषणविषयक संदेश घरोघरी पोहोचवणे आवश्यक आहे. पौष्टिक आहार हा खर्चिकच असतो हा गैरसमज दूर करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. एक सुदृढ, सक्षम आणि कुपोषणमुक्त भारत घडवण्यासाठी राष्ट्रीय पोषण सप्ताह हा एक महत्वपूर्ण टप्पा आहे. तो केवळ एका आठवड्यापुरता न राहता आयुष्यभराची जीवनशैली ठरायला हवा. पोषण ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे, आरोग्य हा विकासाचा पाया आहे आणि सुदृढ नागरिक हेच समृद्ध राष्ट्राचे खरे भांडवल आहे. म्हणूनच प्रत्येकाने हा संदेश मनापासून आत्मसात करून आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्यासाठी योगदान द्यावे, हीच राष्ट्रीय पोषण सप्ताहाची खरी सार्थकता आहे.

राष्ट्रीय पोषण सप्ताहानिमित्त, आपण सर्वांनी एक शपथ घ्यायला हवी की आपण आपल्या आरोग्याची काळजी घेऊ. आपल्या दैनंदिन आहारात स्थानिक आणि मोसमी फळे आणि भाज्यांचा समावेश करू. पाणी भरपूर पिऊ आणि पॅकेज्ड फूड व फास्ट फूड टाळू. आपल्या कुटुंबातील सदस्य, विशेषतः लहान मुलांना आणि ज्येष्ठांना योग्य पोषण मिळेल याची खात्री करू. आरोग्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे. जर आपले शरीर आणि मन निरोगी असेल, तर आपण कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो. राष्ट्रीय पोषण सप्ताह आपल्याला आठवण करून देतो की पोषण ही केवळ एक गरज नसून, जीवनाचा अविभाज्य भाग आहे. चला, १ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर या आठवड्याच्या माध्यमातून आपण आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची जबाबदारी घेऊया. आपण सर्व एक निरोगी भारत घडवण्यासाठी आपले छोटेसे पाऊल उचलून एक मोठी क्रांती घडवू शकतो. सुदृढ शरीर आणि निरोगी मन असेल तरच आपण एक सशक्त आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करू शकतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे, नाशिक**
(लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि वृध्दत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२, ईमेल – bagate.rajendra4@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002